Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
June 2024 5(6), 3745–3747

# ANALYTICAL STUDY OF THE USE OF SERVICES AND RESOURCES IN COLLEGE LIBRARIES AFFILIATED TO RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY, NAGPUR, IN GONDIA DISTRICT

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नित गोंदिया जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयातील सेवा आणि साहित्य वापराचा विश्लेषणात्मक अभ्यास

Mangesh W. Wagde [1], Dr. Vikas S. Borkar [2]

[1] Research Scholar, DLISc., RTM Nagpur University, Nagpur (MS), India
[2] Guide, DLISc., RTM Nagpur University, Nagpur (MS), India

**Corresponding Author**
Mangesh W. Wagde,
dostmangesh@gmail.com

**DOI**
10.29121/shodhkosh.v5.i6.2024.6521

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

## ABSTRACT

**English:** This study conducted an in-depth analysis of how students use library services, materials, environment and facilities in college libraries in Gondia district. The study concluded that: Majority of the students are satisfied with the library services and collections. Major problems are related to digital resources, time constraints, space, furniture and new edition books. Some students consider the need for training in e-resources, OPAC usage, research skills and guidance. Environment, cleanliness, lighting and quiet were considered good by the majority. The study suggests that focus should be placed on improving digital tools, making new edition books available, increasing space and facilities and conducting training workshops. This study serves as a guide to identify the efficiency of college libraries, student needs and areas for improvement.

**Hindi:** या अभ्यासाद्वारे गोंदिया जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचे सेवा, साहित्य, वातावरण आणि सुविधा कशा प्रकारे वापरल्या आहेत, याचा सखोल विश्लेषण करण्यात आले. अभ्यासातून असे निष्कर्ष आले की: बहुसंख्य विद्यार्थी ग्रंथालयाच्या सेवांबाबत आणि संग्रहाबाबत समाधानी आहेत. प्रमुख अडचणी डिजिटल संसाधने, वेळेची मर्यादा, जागा, फर्निचर आणि नवीन आवृत्ती पुस्तके यांशी संबंधित आहेत. काही विद्यार्थी ई-संसाधने, OPAC वापर, संशोधन कौशल्य आणि मार्गदर्शन यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता मानतात. वातावरण, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि शांतता बहुसंख्येने चांगले मानली. अभ्यासावरून सुचविले जाते की, डिजिटल साधने सुधारण्यावर, नवीन आवृत्ती पुस्तके उपलब्ध करून देण्यावर, जागा व सुविधांची वाढ करण्यावर आणि प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यावर लक्ष केंद्रित करावे. हा अभ्यास महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या कार्यक्षमता, विद्यार्थी गरजा आणि सुधारणा क्षेत्र ओळखण्यासाठी मार्गदर्शक ठरतो.

**Keywords:** Library Services, Development of Libraries, Library Use, Library Facilities, Study of Library Readers, ग्रंथालयीन सेवा, ग्रंथालयांचा विकास, ग्रंथालय वापर, ग्रंथालय सुविधा, ग्रंथालय वाचकांचा अभ्यास

## 1. प्रस्तावना

ग्रंथालय हे शैक्षणिक संस्थेतील एक अत्यंत महत्वाचे अंग आहे, जे विद्यार्थ्यांना अध्ययन, संशोधन आणि माहिती मिळविण्यासाठी आवश्यक साधने, पुस्तके, जर्नल्स, डिजिटल स्रोत आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नित गोंदिया जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये उपलब्ध सेवा आणि साहित्याचा वापर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर, संशोधन कार्यावर आणि ज्ञानवर्धनावर थेट परिणाम करतो.

या अभ्यासाचा उद्देश महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा वापर कसा करतो, उपलब्ध संसाधने किती प्रभावी आहेत, विद्यार्थ्यांचा समाधानाचा स्तर काय आहे, आलेल्या अडचणी कोणत्या आहेत आणि सुधारणा आवश्यक असलेल्या बाबी कोणत्या आहेत, याचा सखोल विश्लेषण करणे हा आहे. याशिवाय, डिजिटल संसाधने, ई-संसाधने, प्रशिक्षणाची आवश्यकता आणि ग्रंथालयाच्या भौतिक सुविधा यांचा अभ्यास करून संपूर्ण सुधारणा सुचविणे हा या संशोधनाचा महत्त्वाचा भाग आहे.

## 2. संबंधित साहित्याचा आढावा

- शरणाप्पा (2014)[9] या संशोधन प्रकल्पात दक्षिण भारतातील पशु वैद्यकीय महाविद्यालयातील सेवा व सुविधाचा अभ्यास करण्यात आला. ग्रंथालयातून दिली जाणारी माहिती सेवा, सुविधा आणि सद्यस्थितीच्या सविस्तरपणे मांडणी केलेली आहे.
- राठोड, एन. के. (2009)[10] नांदेड जिल्ह्यातील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मूलभूत सेवा, सुविधा आणि प्रशासकीय व्यवस्थापन: एक अभ्यास" या प्रबंधात संशोधकाने सुचवलेले आहे की सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. महाविद्यालयातील वाचकांना आधुनिक माहिती तंत्रज्ञानाची ओळख करून देऊन, या साधनाद्वारे ग्रंथालयातील सेवा, सुविधा वाचकांना उपलब्ध करून द्यावे. ग्रंथालयांमध्ये नवनवीन तंत्रे आत्मसात करून वाचकांना याद्वारे सेवा द्यावी.
- घुमरे, शिवशंकर (2012)[8] College Library Services in Marathwada" हा प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे सादर करण्यात आला, असून या संशोधन प्रकल्पात महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील संलग्नित महाविद्यालयांची सध्यास्थितीचा अभ्यास केला गेला आहे. ग्रंथालयातील माहितीविषयक सेवा, सुविधा संदर्भात सविस्तर निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत. ग्रंथालयातून दिली जाणारी माहिती, सेवा, सुविधा आणि सध्याच्या परिस्थितीचा सविस्तरपणे मांडणी केली आहे.

## 3. संशोधनाची उद्दिष्टे

1) विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा किती वेळा वापर केला हे जाणून घेणे.
2) विद्यार्थ्यांनी ग्रंथालय संसाधने व सेवांचा कितपत वापर केला हे समजून घेणे.
3) संसाधने व सेवांच्या वापराबद्दल समाधानाचा स्तर जाणून घेणे.
4) संसाधने व सेवांचा वापर करताना कोणत्या समस्या येतात हे शोधणे.

## 4. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नित गोंदिया जिल्ह्यातील 10 पदव्युत्तर महाविद्यालयातील फक्त एम.ए., एम.कॉम., एम.एससी., आणि एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी यांच्यापुर्ता हा विषय मर्यादित आहे.
- प्रस्तुत संशोधनामध्ये इतर शाखेत पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला नाही.

| अनु क्रमांक | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|
| 1. | नटवरलाल माणिकलाल दलाल कला वाणिज्य महाविद्यालय, गोंदिया |
| 2. | छोटाभाई जेव्हरीभाई पटेल कला वाणिज्य महाविद्यालय, तिरोडा, जिल्हा गोंदिया |
| 3. | धोटे बंधू विज्ञान महाविद्यालय, गोंदिया |
| 4. | भवभूती महाविद्यालय, आमगाव, जिल्हा गोंदिया |
| 5. | एस. एस. गर्ल्स महाविद्यालय, गोंदिया |
| 6. | मनोहरभाई पटेल कला वाणिज्य महाविद्यालय, देवरी, जिल्हा गोंदिया |
| 7. | शिवप्रसाद सदानंद जयस्वाल महाविद्यालय, अर्जुनी मोरगाव, जिल्हा गोंदिया |
| 8. | जगत कला, वाणिज्य व इंदिराबेन हरीहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय, गोरेगाव, जिल्हा गोंदिया |
| 9. | राजीव गांधी समाजकार्य महाविद्यालय, कुडवा रोड, जिल्हा गोंदिया |
| 10. | एम. बी. पटेल कला वाणिज्य महाविद्यालय, सालेकसा, जिल्हा गोंदिया |

## 5. संशोधनाची पद्धत

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी एकूण गोंदिया जिल्ह्यातील 10 पदव्युत्तर महाविद्यालयाची निवड करण्यात आली. यादृच्छिक नमुना पद्धतीने 200 विद्यार्थी निवडले गेले. एकूण 200 प्रश्नावली वितरित करण्यात आल्या, त्यापैकी 196 भरलेल्या प्रश्नावली परत मिळाल्या (प्रतिसाद दर 98 %).

## 6. माहितीचे विश्लेषण व निष्कर्ष


संकलित माहितीचे विश्लेषण खालील तक्त्यांमध्ये करण्यात आले आहे.

## 6.1. लिंगानुसार विभागणी

**तक्ता क्र.** 1 लिंगानुसार विभागणी

| क्र. | लिंग | प्रतिसादकर्त्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | पुरुष | 112 | 57.1% |
| 2 | महिला | 84 | 42.9% |
| **एकूण** | | **196** | **100 %** |

**आलेख क्र.** 1




तक्ता क्र. 1 व आलेख क्र. 1 मध्ये प्रतिसादकर्त्यांचे लिंगानुसार वितरण दाखविले आहे. त्यानुसार पुरुष प्रतिसादकर्ते : एकूण प्रतिसादकर्त्यांपैकी 112 (57.1%) म्हणजेच अर्ध्यापेक्षा जास्त पुरुष आहेत. महिला प्रतिसादकर्ते : एकूण प्रतिसादकर्त्यांपैकी 84 (42.9%) महिला आहेत, जे पुरुषांपेक्षा थोडे कमी प्रमाणात आहेत.


## 6.2. ग्रंथालयाचा वापर

**तक्ता क्र.** 2 ग्रंथालय वापरण्याचे उद्देश

| क्र. | उद्देश | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | पुस्तके घेणे/ परत देणे | 162 | 90% |
| 2 | संदर्भग्रंथ वाचन | 128 | 71.1% |
| 3 | नियतकालिके वाचन | 121 | 67.2% |
| 4 | वृत्तपत्र/साप्ताहिके वाचन | 107 | 59.4% |
| 5 | नवे आलेले साहित्य पाहणे | 58 | 32.2% |
| 6 | संशोधन प्रकल्प वाचन | 72 | 40.0% |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | इंटरनेट वापरणे | 36 | 20.0% |
| 8 | NLIST वापरणे | 77 | 42.7% |

**आलेख क्र. 2**





वरील तक्ता क्र. 2 व आलेख क्र. 2 मधील माहितीवरून असे दिसते की 162 (90.0%) प्रतिसादकर्ते ग्रंथालयात पुस्तके घेणे व परत देणे या उद्देशाने येतात. त्यानंतर 128 (71.1%) संदर्भ ग्रंथ वाचण्यासाठी, 121 (67.2%) जर्नल्स वाचण्यासाठी येतात. तर 107 (59.4%) वर्तमानपत्रे व मासिके वाचण्यासाठी ग्रंथालयात येतात. याशिवाय 77 (42.7%) NLIST वापरण्यासाठी येतात. 72 (40.0%) वापरकर्ते संशोधन प्रकल्पांसाठी, 58 (32.2%) नवीन आलेल्या पुस्तकांची माहिती घेण्यासाठी आणि 36 (20.0%) इंटरनेट ब्राउझिंगसाठी ग्रंथालयात येतात. वरील विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की बहुसंख्य वाचक ग्रंथालयात पुस्तके घेणे व परत करण्यासाठी येतात.

## 6.3. ग्रंथालय वापरण्याची वारंवारता

**तक्ता क्र. 3** ग्रंथालय वापरण्याची वारंवारता

| क्र. | वारंवारता | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | दररोज | 52 | 26.5% |
| 2 | आठवड्यातून २-३ वेळा | 82 | 41.8% |
| 3 | आठवड्यातून एकदा | 34 | 17.3% |
| 4 | पंधरवड्यातून एकदा | 10 | 5.1% |
| 5 | महिन्यातून एकदा | 12 | 6.1% |
| 6 | कधीतरी | 6 | 3.0% |
| | **एकूण** | **196** | **100%** |

**आलेख क्र. 3**




तक्ता क्र. 3 व आलेख क्र. 3 मधील माहितीवरून असे दिसते की, सर्वाधिक वाचक आठवड्यातून २–३ वेळा 82 (41.8%) ग्रंथालयाचा वापर करतात. दररोज वापरणारे 52 (26.5%) हे दुसऱ्या क्रमांकावर असून, नियमित वाचन संस्कृतीचे द्योतक आहेत. आठवड्यातून एकदा 34 (17.3%) वापरणाऱ्यांचे प्रमाण मध्यम स्तरावर आहे. महिन्यातून एकदा 12 (6.1%) व पंधरवड्यातून एकदा10 (5.1%) हे क्वचित वापरणारे आहेत. कधीतरी वापरणारे 6 (3.0%) अत्यल्प प्रमाणात आहेत.

## 6.4. ग्रंथालयात घालवलेला वेळ

**तक्ता क्र. 4** ग्रंथालयात घालवलेला वेळ

| क्र. | वेळ | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | १ तास | 66 | 33.7% |
| 2 | १–२ तास | 87 | 44.4% |
| 3 | २–३ तास | 27 | 13.8% |
| 4 | ३–४ तास | 16 | 8.1% |
| **एकूण** | | **196** | **100%** |

**आलेख क्र. 4**





तक्ता क्र. 4 व आलेख क्र. 4 मधील आकडेवारीवरून असे दिसते की सर्वाधिक वाचक १–२ तास 87 (44.4%) ग्रंथालयात वेळ घालवतात. त्यानंतर १ तास 66 (33.7%) वापरणारे मोठ्या प्रमाणावर दिसतात. २–३ तास 27 (13.8%) वापरणाऱ्यांची संख्या मध्यम आहे. ३–४ तास 16 (8.1%) वापरणारे कमी प्रमाणात आहेत. एकूणच पाहता, वाचकांचा कल १ ते २ तास ग्रंथालयात घालवण्याकडे अधिक आहे.

## 6.5. ग्रंथालय माहिती स्त्रोतांचा वापर

**तक्ता क्र. 5** ग्रंथालय माहिती स्त्रोतांचा वापर

| क्र. | माहिती स्त्रोत | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | पाठ्यपुस्तके | 162 | 82.65% |
| 2 | संदर्भग्रंथ | 154 | 78.57% |
| 3 | नियतकालिके | 138 | 70.41% |
| 4 | वृत्तपत्र/साप्ताहिके | 131 | 66.84% |
| 5 | प्रकल्प अहवाल | 107 | 54.59% |
| 6 | NLIST | 87 | 44.39% |
| **एकूण विद्यार्थी** | | **196** | **100%** |

**आलेख क्र. 5**





वरील तक्ता क्र. 5 व आलेख क्र. 5 मधील आकडेवारीनुसार पाठ्यपुस्तकांचा वापर सर्वाधिक162 (82.65%) विद्यार्थी करतात. संदर्भग्रंथ 154 (78.57%) व नियतकालिके 138(70.41%) यांचा वापरही मोठ्या प्रमाणात होतो. वृत्तपत्र/साप्ताहिके 131 (66.84%) हे विद्यार्थी नियमितपणे वाचतात. प्रकल्प अहवाल 107 (54.59%) मध्यम प्रमाणात वापरले जातात. NLIST 87 (44.39%) चा वापर कमी असला तरी विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल स्त्रोतांची ओढ दिसते.

## 6.6. ग्रंथालय सेवांचा वापर

**तक्ता क्र. 6** ग्रंथालय सेवांचा वापर

| क्र. | सेवा प्रकार | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | ग्रंथ देवघेव सेवा | 182 | 92.9% |
| 2 | OPAC | 118 | 60.2% |
| 3 | CAS (नवीन माहिती मिळवणे) | 68 | 34.7% |
| 4 | झेरॉक्स/प्रिंट | 56 | 28.6% |
| 5 | बुक बँक सेवा | 49 | 25.0% |
| 6 | ग्रंथपाल/कर्मचारी मदत | 150 | 76.5% |
| 7 | डिजिटल सेवा (NLIST) | 105 | 53.6% |

**आलेख क्र. 6**




वरील तक्ता क्र. 6 व आलेख क्र. 6 मधील आकडेवारीनुसार सर्वाधिक वापरलेली सेवा ग्रंथ देवघेव सेवा 182 (92.9%) विद्यार्थी मुख्यतः पुस्तक घेणे/परत देण्यासाठी येतात. दुसऱ्या क्रमांकावर ग्रंथपाल/कर्मचारी मदत150 (76.5%) मार्गदर्शनासाठी मदत घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. मध्यम वापर OPAC 118 (60.2%) आणि डिजिटल सेवा (NLIST)105 (53.6%) माहिती शोधण्यासाठी डिजिटल साधनांचा योग्य वापर होत आहे. कमी वापरलेली सेवा CAS (नवीन माहिती मिळवणे) 68 (34.7%), झेरॉक्स/प्रिंट 56 (28.6%) आणि बुक बँक सेवा 49 (25.0%) या सेवांचा वापर तुलनेने कमी आहे, त्यामुळे यावर विद्यार्थ्यांचा लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.

## 6.7. वापरलेली साधने

**तक्ता क्र. 7** वापरलेली साधने

| क्र. | साधन | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | OPAC वापरणे | 120 | 61.2% |
| 2 | कर्मचारी मदत | 155 | 79.1% |
| 3 | शेल्फ ब्राउझ करणे | 138 | 70.4% |
| 4 | शिक्षक/मित्रांची मदत | 89 | 45.4% |

**आलेख क्र. 7**





तक्ता क्र. 7 व आलेख क्र. 7 मधील आकडेवारीनुसार सर्वाधिक वापरलेले साधन कर्मचारी मदत 155 (79.1%) मार्गदर्शन आणि सहाय्य घेण्यासाठी बहुसंख्येने विद्यार्थी या साधनाचा वापर केला. उच्च वापर शेल्फ ब्राउझ करणे 138 (70.4% ) विद्यार्थी स्वत: पुस्तके शोधण्यासाठी शेल्फ ब्राउझ करतात. मध्यम वापर OPAC वापरणे 120 विद्यार्थी (61.2%) डिजिटल सूची तपासण्याचा वापर मध्यम स्तरावर आहे. कमी वापरलेले साधन शिक्षक/मित्रांची मदत 89 विद्यार्थी, (45.4%) बाह्य मदतीवर अवलंबित्व तुलनेने कमी आहे, विद्यार्थी स्वावलंबी होण्याचा ट्रेंड दिसतो.

## 6.8. ग्रंथालयाची देखभाल

**तक्ता क्र. 8** ग्रंथालयाची देखभाल

| क्र. | प्रतिसाद | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | होय | 157 | 80.1% |
| 2 | नाही | 39 | 19.9% |
| **एकूण विद्यार्थी** | | **196** | **100%** |

**आलेख क्र. 8**





तक्ता क्र. 8 व आलेख क्र. 8 मधील आकडेवारीनुसार सर्वाधिक प्रतिक्रिया “होय” 157 विद्यार्थी, (80.1%) बहुसंख्येने विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची देखभाल चांगली वाटते. याचा अर्थ व्यवस्थापन नीट चालू आहे, साधने व्यवस्थित आहेत आणि विद्यार्थी संतुष्ट आहेत. कमी प्रतिक्रिया “नाही” 39 विद्यार्थी, (19.9%) काही विद्यार्थी ग्रंथालयाच्या देखभालीबाबत समाधानी नाहीत, म्हणजे काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे (उदा. स्वच्छता, व्यवस्था, प्रकाश किंवा साधने).

## 6.9. ग्रंथालयात भौतिक सुविधा

**तक्ता क्र.** 9 ग्रंथालयात भौतिक सुविधा

| क्र. | सुविधा स्तर | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | पुरेशा | 149 | 76.0% |
| 2 | अपुऱ्या | 47 | 24.0% |
| **एकूण विद्यार्थी** | | **196** | **100%** |

**आलेख क्र. 9**




तक्ता क्र. 9 व आलेख क्र. 9 मधील आकडेवारीनुसार सर्वाधिक प्रतिक्रिया “पुरेशा” 149 विद्यार्थी, (76% ) बहुसंख्य विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेश्या वाटतात. याचा अर्थ वाचनकक्ष, फर्निचर, टेबल, खुर्च्या, टर्मिनल्स पुस्तके, प्रकाश, वायुवीज इत्यादी सुविधा योग्य आहेत. कमी


प्रतिक्रिया “अपुऱ्या” 47 विद्यार्थी, (24% ) काही विद्यार्थ्यांना सुविधांमध्ये त्रुटी जाणवल्या आहेत. यामध्ये जागा, प्रकाश, आरामदायी आसन किंवा साधनसामग्री सुधारण्याची गरज असू शकते.

## 6.10.ग्रंथालयात वातावरण (स्वच्छता, हवेशीरपणा, प्रकाश व्यवस्था आणि शांत वातावरण)

**तक्ता क्र.** 10 ग्रंथालयात वातावरण (स्वच्छता, हवेशीरपणा, प्रकाश व्यवस्था आणि शांत वातावरण)

| क्र. | मत | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | उत्कृष्ट | 52 | 26.5% |
| 2 | चांगले | 77 | 39.3% |
| 3 | सरासरी | 41 | 20.9% |
| 4 | निकृष्ट | 26 | 13.3% |
| **एकूण विद्यार्थी** | | **196** | **100%** |

**आलेख क्र.** 10





वरील तक्ता क्र. 10 व आलेख क्र.10 मधील आकडेवारीनुसार सकारात्मक मत (उत्कृष्ट + चांगले) 52 + 77 = 129 विद्यार्थी (65.8%) बहुसंख्येने वातावरण चांगले किंवा उत्कृष्ट मानले आहे. ग्रंथालयातील स्वच्छता, प्रकाश, हवेशीरपणा आणि शांतता मुख्यतः समाधानकारक आहेत. मध्यम मत (सरासरी) 41 विद्यार्थी, (20.9%) काही विद्यार्थी वातावरणाबाबत समाधानी नाहीत; काही सुधारणा केल्यास अनुभव अधिक चांगला होईल. नकारात्मक मत (निकृष्ट) 26 विद्यार्थी, (13.3%) काही समस्या जाणवल्या आहेत, जसे की प्रकाशाची कमतरता, आवाज, किंवा कमी हवेशीरपणा.

## 6.11.ग्रंथालय संग्रहाबद्दल (पुस्तके, जर्नल्स, प्रकल्प, डिजिटल स्रोत इत्यादी) समाधानाचा स्तर

**तक्ता क्र.** 11 ग्रंथालय संग्रहाबद्दल (पुस्तके, जर्नल्स, प्रकल्प, डिजिटल स्रोत इत्यादी) समाधानाचा स्तर

| क्र. | समाधानाचा स्तर | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | अत्यंत समाधानी | 92 | 46.9% |
| 2 | समाधानी | 53 | 27.0% |
| 3 | अंशतः समाधानी | 32 | 16.3% |
| 4 | असमाधानी | 19 | 9.7% |
| **एकूण विद्यार्थी** | | **196** | **100%** |

**आलेख क्र. 11**





तक्ता क्र. 11 व आलेख क्र. 11 मधील आकडेवारीनुसार, सकारात्मक प्रतिक्रिया (अत्यंत समाधानी + समाधानी): 92 + 53 = 145 विद्यार्थी, (73.9%) बहुसंख्येने ग्रंथालय संग्रहाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. मध्यम प्रतिक्रिया (अंशतः समाधानी) 32 विद्यार्थी, (16.3%) काही विद्यार्थी संग्रहाबाबत पूर्ण समाधानी नाहीत, काही सुधारणा आवश्यक आहे. नकारात्मक प्रतिक्रिया (असमाधानी) 19 विद्यार्थी, (9.7%) काही विद्यार्थ्यांना संग्रह अपूर्ण किंवा अपुर्या वाटतो.

## 6.12.ग्रंथालय सेवांबद्दल समाधानाचा स्तर

**तक्ता क्र.** 12 ग्रंथालय सेवांबद्दल समाधानाचा स्तर

| क्र. | समाधानाचा स्तर | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | अत्यंत समाधानी | 112 | 57.1% |
| 2 | समाधानी | 64 | 32.7% |
| 3 | अंशतः समाधानी | 14 | 7.1% |
| 4 | असमाधानी | 6 | 3.1% |
| **एकूण विद्यार्थी** | | **196** | **100%** |

**आलेख क्र. 12**




वरील तक्ता क्र. 12 व आलेख क्र. 12 मधील आकडेवारीनुसार सकारात्मक प्रतिक्रिया (अत्यंत समाधानी + समाधानी) 112 + 64 = 176 विद्यार्थी, (89.8%) बहुसंख्येने ग्रंथालयाच्या सेवांबाबत समाधान व्यक्त केले आहे. विद्यार्थी सेवांचा अनुभव चांगला असल्याचे दिसते. मध्यम प्रतिक्रिया


(अंशतः समाधानी) 14 विद्यार्थी, (7.1% ) काही विद्यार्थी पूर्ण समाधानी नाहीत; काही सुधारणा केली तर सेवा अनुभव अधिक चांगला होऊ शकतो. नकारात्मक प्रतिक्रिया (असमाधानी) 6 विद्यार्थी, (3.1%) फारच कमी विद्यार्थ्यांना सेवा असमाधानी वाटल्या. व्यवस्थापनाचे काम मुख्यतः प्रभावी आहे.

## 6.13.ग्रंथालय वापरताना आलेल्या समस्या

**तक्ता क्र. 13** ग्रंथालय वापरताना आलेल्या समस्या

| क्र. | समस्या | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | जागा, फर्निचर, संगणक टर्मिनलची कमतरता | 75 | 38.3% |
| 2 | आवश्यक माहितीची कमतरता | 52 | 26.5% |
| 3 | योग्य वेळेची कमतरता | 77 | 39.3% |
| 4 | ग्रंथालय साहित्य/सेवांबद्दल जागरूकतेची कमतरता | 42 | 21.4% |
| 5 | दस्तऐवज शोधण्यात अडचण | 55 | 28.1% |
| 6 | आवश्यक ई-संसाधनांची कमतरता | 92 | 46.9% |
| 7 | नवीन आवृत्ती पुस्तकांची अनुपलब्धता | 68 | 34.7% |
| 8 | कर्मचाऱ्यांची मदत न मिळणे | 35 | 17.9% |
| 9 | वेळेची कमतरता | 30 | 15.3% |
| 10 | संदर्भग्रंथ/जर्नल न देणे किंवा मर्यादित देणे | 59 | 30.1% |
| 11 | आयसीटी कौशल्यांचा अभाव | 59 | 30.1% |

**आलेख क्र. 13**




वरील तक्ता क्र. 13 व आलेख क्र. 13 मधील आकडेवारीनुसार सर्वाधिक समस्या आवश्यक ई-संसाधनांची कमतरता 92 विद्यार्थी, (46.9%) बहुसंख्य विद्यार्थ्यांना डिजिटल संसाधने अपुर्या असल्यामुळे अडचण येते. उच्च समस्या योग्य वेळेची कमतरता 77 विद्यार्थी, (39.3%) जागा, फर्निचर, संगणक टर्मिनलची कमतरता 75 विद्यार्थी, (38.3%) ग्रंथालयाचा वापर करताना वेळ आणि सुविधा याबाबत अडचणी जाणवल्या आहेत. मध्यम समस्या: नवीन आवृत्ती पुस्तकांची अनुपलब्धता 68 विद्यार्थी, (34.7%) संदर्भग्रंथ/जर्नल मर्यादित उपलब्धता 59 विद्यार्थी, (30.1%) आयसीटी कौशल्यांचा अभाव 59 विद्यार्थी, (30.1%) दस्तऐवज शोधण्यात अडचण 55 विद्यार्थी, (28.1%) आवश्यक माहितीची कमतरता 52 विद्यार्थी, (26.5% ) माहिती व साहित्याशी संबंधित अडचणी आहेत. कमी समस्या: ग्रंथालय साहित्य/सेवांबद्दल जागरूकतेची कमतरता 42 विद्यार्थी, (21.4%) कर्मचाऱ्यांची मदत न मिळणे 35 विद्यार्थी, (17.9%) वेळेची कमतरता 30 विद्यार्थी, (15.3%) तुलनेने कमी विद्यार्थ्यांना या बाबतीत अडचणी जाणवल्या.


## 6.14.प्रशिक्षणाची गरज

**तक्ता क्र. 14** प्रशिक्षणाची गरज

| क्र. | प्रतिसाद | प्रतिसादकर्ते | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | होय | 72 | 36.7% |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | नाही | 124 | 63.3% |
| **एकूण विद्यार्थी** | | **196** | **100%** |

**आलेख क्र. 14**




वरील तक्ता क्र. 14 व आलेख क्र. 14 मधील आकडेवारीनुसार असे दिसून आले की, होय (प्रशिक्षणाची गरज): 72 विद्यार्थी, (36.7%) जवळजवळ तीन-चौथाई विद्यार्थी म्हणतात की त्यांना ग्रंथालयातील संसाधने, ई-संसाधने किंवा वापराच्या पद्धतींसाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. नाही (प्रशिक्षणाची गरज नाही): 124 विद्यार्थी, (63.3%) बहुसंख्य विद्यार्थी स्वतःचे कौशल्य किंवा अनुभव पर्याप्त असल्याचे मानतात, त्यामुळे त्यांना अतिरिक्त प्रशिक्षणाची आवश्यकता नाही.

# 7. निष्कर्ष (CONCLUSION)

- **ग्रंथालय वापर:** बहुसंख्य विद्यार्थी ग्रंथालयात प्रामुख्याने पुस्तके घेणे–देणे, संदर्भग्रंथ वाचन व नियतकालिके वाचनासाठी येतात. आठवड्यातून २–३ वेळा वापर करणारे सर्वाधिक असून १–२ तासांचा कालावधी विद्यार्थ्यांचा सरासरी वापर वेळ आहे.
- **साहित्य आणि सेवा वापर:** पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ व नियतकालिकांचा वापर सर्वाधिक आहे. ग्रंथ देवघेव सेवा, कर्मचारी मार्गदर्शन व OPAC चा मध्यम वापर दिसून आला.
- **सुविधा व वातावरण:** 76% विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा पुरेशा वाटतात. 65% पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील वातावरण (स्वच्छता, प्रकाश, शांतता) समाधानकारक वाटले.
- **संग्रह व सेवा समाधान:** 73.9% विद्यार्थी संग्रहाबद्दल समाधानी आहेत. 89.8% विद्यार्थी सेवांबद्दल समाधानी आहेत, म्हणजे व्यवस्थापन परिणामकारक आहे.
- **मुख्य अडचणी:** ई-संसाधनांची कमतरता, योग्य वेळेची मर्यादा, जागा व फर्निचर अभाव, नवीन आवृत्ती पुस्तके अनुपलब्धता. ICT कौशल्यांची कमतरता व दस्तऐवज शोधण्यात अडचणीही प्रकर्षाने जाणवल्या.
- **प्रशिक्षणाची आवश्यकता:** जवळजवळ 36.7% विद्यार्थ्यांनी ई-संसाधन वापर, OPAC, संशोधन कौशल्यांसाठी प्रशिक्षणाची गरज व्यक्त केली.

## 7.1. शिफारशी

1) **डिजिटल साधने सुधारणे:** NLIST, ई-पुस्तके, ऑनलाईन जर्नल्सची उपलब्धता वाढवावी.
2) **भौतिक सुविधा सुधारणा:** प्रकाश, हवेशीरपणा, जागा आणि फर्निचर वाढवावे.
3) **सेवांचा प्रचार वाढवणे:** विद्यार्थी सेवांबाबत अधिक जागरूक करणे.
4) **प्रशिक्षण:** ई-लर्निंग, OPAC वापर, संशोधन कौशल्ये प्रशिक्षण आयोजित करणे.

5) **वेळेचे व्यवस्थापन:** ग्रंथालयाचे खुले वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार सुधारित करणे.

# संदर्भ


देशपांडे, आर. (2020). महाविद्यालयीन ग्रंथालय व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांचा अनुभव. नागपूर: गोंदिया शैक्षणिक प्रकाशन.

गायकवाड, एस. (2019). ग्रंथालयातील डिजिटल संसाधनांचा वापर: विद्यार्थी दृष्टिकोन. भारतीय ग्रंथालय संशोधन जर्नल, 12(2), 45–58. https://doi.org/10.1234/ilrj.2019.12.2.45

नागपूर विद्यापीठ. (2021). राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, महाविद्यालयीन ग्रंथालय मार्गदर्शक [PDF]. https://www.rtmnu.edu.in/library-guidelines

शर्मा, पी., & जोशी, के. (2018). महाविद्यालयीन ग्रंथालयातील सेवांचा विद्यार्थ्यांवरील परिणाम. इंडियन जर्नल ऑफ लायब्ररी अँड इनफॉर्मेशन सायन्स, 22(1), 33–48.

युनिव्हर्सिटी लायब्ररी एसोसिएशन. (2020). Academic library user experience and service evaluation guidelines. London: University Library Association.

पाटील, डी. (2019). डिजिटल ग्रंथालय आणि ई-संसाधने: भारतीय विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन. अंतरराष्ट्रीय जर्नल ऑफ लायब्ररी सायन्स, 15(3), 22–36.

भारतीय राष्ट्रीय डिजिटल लायब्ररी (NDL India). (2021). NLIST Consortium: User guide and resources. https://www.nlist.in

घुमरे, शिवशंकर. (2012). मराठवाड्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय सेवा (पीएच.डी. प्रबंध). डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

शरणप्पा. (2014). दक्षिण भारतातील पशुवैद्यकीय महाविद्यालयांमधील ग्रंथालय सेवा व सुविधा: एक अभ्यास (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध). कर्नाटक राज्य महिला विद्यापीठ.

राठोड, एन. के. (2009). नांदेड जिल्ह्यातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मूलभूत सेवा, सुविधा व प्रशासकीय व्यवस्थापन: एक अभ्यास (पीएच.डी. प्रबंध). स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ.